संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

---

## संत गाडगे बाबा जयंतीनिमित्त भव्य रॅली व गरजूंना वस्त्र वाटप

### दशसूत्रीच्या संदेशाप्रमाणे विद्यापीठाचे कार्य - कुलगुरू

अमरावती.

मानवतेचा संदेश देणारी श्री संत गाडगे बाबांची दशसूत्री विश्वव्यापी असून त्यानुसार विद्यापीठाचे कार्य सुरू असल्याचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले. संत गाडगे बाबा अध्यासन व रासेयोच्या संयुक्त विद्यमाने गाडगे बाबांच्या जयंतीनिमित्त भव्य रॅली व गरजूंना वस्त्र वाटप कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. श्री संत गाडगे महाराज मंदीरामध्ये कुलगुरूंनी गाडगे बाबांना अभिवादन केल्यानंतर रॅली काढण्यात आली, त्याचा समारोप विद्यापीठ मुख्य प्रवेद्वारासमोरील कार्यक्रमप्रसंगी झाला. विद्यापीठात सफाई कामगार म्हणून कार्यरत महिला व पुरुषांना त्यांच्या हस्ते वस्त्र वाटप करण्यात आले.

कुलगुरू पुढे म्हणाले, गाडगे बाबांचे नांव असलेल्या विद्यापीठाचा मी कुलगुरू आहे, याचा अत्यानंद होत असून शिक्षण समाजाभिमुख व्हावे, स्वावलंबन हा विषय बाबांनी समाजाला दिला. १७५ गावे विद्यापीठाने दत्तक घेतली असून विद्यार्थ्यांच्या मार्फत समाजाला शिक्षित करण्याचा प्रयत्न विद्यापीठ करीत आहे. गाडगे बाबांच्या अनौपचारिक शिक्षणाच्या दृष्टीकोनातून विद्यापीठ सातत्याने वाटचाल करीत असल्याचेही ते म्हणाले.

सुरुवातीला श्री संत गाडगे बाबांच्या शिल्पाला पुष्पार्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक श्री संत गाडगे बाबा अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप काळे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, माजी कुलगुरू डॉ. गणेश पाटील, डॉ. विलास सपकाळ, माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, व्य.प. सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, वि. व तं. विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, डॉ.व्ही.एम. मेटकर, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, रा.से.यो. प्रभारी संचालक डॉ. राजेश बुरंगे आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. संचालन श्री राजेश पिदडी यांनी, तर आभार डॉ. राजेश बुरंगे यांनी मानले. यावेळी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, शहरातील विविध महाविद्यालयांचे रासेयो पथकातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति,                                                                 **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी                                           दि. २३/०२/२०२०.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी